ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175


वर्ष ३७ पुणे, बुधवार, ६ ऑक्टोबर, १९७१ अंक १९


## पंपाची अचूक निवड कशी कराल ?

खरेदीची किंमत कमी ........ पण चालविण्याचा खर्च जास्त

खरेदीची किंमत थोडी जास्त पण चालविण्याचा खर्च कमी

STUSA 772



## किर्लोस्कर ‘केई’ पंप

पंप खरेदी करताना
‘किर्लोस्कर’ पंपाचीच
निवड करा.

पंपाची निवड करताना खरेदीच्या किंमतीपेक्षाहि त्याचा चालविण्याचा खर्च लक्षांत घ्यावा लागतो. कारण हा खर्च रोजच्या रोज करावा लागतो. एखादा पंप किंमतीच्या दृष्टीनें स्वस्त असला पण त्याचा रोजचा तेलाचा किंवा विजेचा खर्च बाजवीपेक्षा जास्त येऊ लागला तर वर्षाअखेर हिशेब करताना तो पंप खूपच महाग पडला आहे असे दिसून येते.

- किर्लोस्कर ‘केई’ पंप या हिशेबाने फायदेशीर पंप आहे.
- या पंपाची कार्यक्षमता जास्त असल्यामुळे त्याचा विजेचा किंवा तेलाचा खर्च खूपच कमी येतो.
- किर्लोस्कर ‘केई’ पंप कमी वेळांत पुरेसा पाणीपुरवठा करीत असल्यामुळे मजुरीतहि बचत होते.
- म्हणून सच्या हिशेबी दृष्टीने पाहिले तर किर्लोस्कर ‘केई’ पंप स्वस्तच पडतो.

किर्लोस्कर

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
उद्योगभवन, टिळक रोड, पुणे २

® Registered users of the Trade Mark

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,२२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

---

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी

दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९००७६

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)


महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

---




**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone: 318 Sangli
Gram: 'SEWA Madhavnagar

---




■ LESS FUEL CONSUMPTION
■ GETS HEATED EQUALLY FROM ALL SIDES
■ LIGHT WEIGHT ■ NON RUSTABLE
■ RETURN VALUE 35% LESS.

Mfgd. by
**VARSHA INDUSTRIES**
64/23, ERANDWANA, LAW COLLEGE RD POONA 4
PHONE : 55435

☆ अर्थ ☆

बुधवार, ६ ऑक्टोबर, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## बिगर–बँकिंग कंपन्यांकडील ठेवी
### रिझर्व्ह बँकेचा इशारा

रिझर्व्ह बँकेने एका प्रेस नोटच्या द्वारा, बिगर–बँकिंगकंपन्यांना ठेवी किंवा बिनतारणाची कर्जे देणाऱ्यांना इशारा दिला आहे. ह्या ठेवी आणि कर्ज स्वीकारणाऱ्या आपण रिझर्व्ह बँकेच्या सूचना अमलात आणलेल्या आहेत, असे कंपन्या म्हणतात एवढ्या वरून त्या ठेवी व कर्जे पूर्णपणे सुरक्षित आहेत असे मानू नये; कंपन्या ठेवी किंवा कर्जे परत करू शकल्या नाहीत तर रिझर्व्ह बँकेकडे दाद मागता येणार नाही; असे प्रेस नोटमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

“ठेवी घेणाऱ्या कंपन्यांत आर्थिक दृष्ट्या भक्कम असलेल्या अनेक कंपन्या असल्या तरी कमकुवत कंपन्याही त्यात असणार. रिझर्व्ह बँकेच्या सूचना अमलात आणल्याने केवळ तो कमकुवत-पणा नाहीसा होणार नाही.

“तेव्हा, ठेवीदारांनी ठेवी ठेवण्यापूर्वी कंपनी खऱ्याखुऱ्या व्यावसायिक कारणासाठीच ठेवी घेत आहेत, हे तपासून पाहावे; कंपनीचा कारभार कार्यक्षम आहेना ह्याचीही खात्री करून घ्यावी.

“बिगर-बँकिंग कंपन्यांकडील ठेवींना इन्कम टॅक्स आणि वेल्थ टॅक्सच्या सवलती मिळत नाहीत; त्या ठेवींना विम्याचे संरक्षणही नाही. (बँकांकडील प्रत्येक ठेवीदाराची १०,००० रुपयांपर्यंतची ठेव विम्याने सुरक्षित केलेली असते.)

“काही बिगर–बँकिंग कंपन्या वृत्तपत्रांत जाहिराती देऊन ठेवींना आवाहन करतात. काही दलालही काही कंपन्यांच्या वतीने ठेवीसाठी जाहिराती देतात. ह्या कंपन्या रिझर्व्ह बँकेचे नियम पाळीत असल्यामुळे त्यांच्याकडील ठेवी सुरक्षित आहेत आणि ठेवीदारांचे पैसे वेळेवर परत न मिळण्याची त्यामुळे भीती नाही, असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न अशा काही जाहिरातींमधून केला जातो.

“बिगर-बँकिंग कंपन्यांनी स्वीकारावयाच्या ठेवीवर रिझर्व्ह बँकेची काही बंधने आहेत. कंपन्यांनी किती रकमेच्या ठेवी घ्याव्यात ह्याची कमाल मर्यादा नियमांनी ठरवून दिलेली आहे. साधारणतः कोणत्याही कंपनीला स्वतःचे वसूल भांडवल अधिक मुक्त गंगाजळी ह्यांच्या २५% पेक्षा जास्त ठेवी घेता येत नाहीत. कंपन्यांच्या भागधारकांकडून घेतलेल्या बिगर-तारणाच्या कर्जांचा समावेश सध्यातरी ह्या ठेवींच्या कमाल मर्यादेत समाविष्ट नाही.

“ठेवी मागणाऱ्या जाहिरातीत कंपन्यांनी कोणती माहिती दिली पाहिजे, त्याचेही नियम रिझर्व्ह बँकेने घालून दिलेले आहेत. (व्यवस्थापनाचा तपशील,, व्यवसायाचे स्वरूप, नफा, डिव्हिडंड, भागभांडवल, गंगाजळी, ठेवी व इतर देणी, इ.) त्याचा हेतू असा की ठेव ठेवणारांना कंपनीची आर्थिक परिस्थिती माहीत व्हावी.

“ह्या नियमामुळे ठेवीदारांना थोडेफार मार्गदर्शन होत असले, तरी कंपनी बुडणार नाही किंवा ठेवीदार संकटात येणार नाहीत, अशी हमी मात्र त्यामुळे कोणी समजू नये.”

(काही खाजगी फर्म्स आणि व्यक्ती ठेवी स्वीकारतात, आणि त्यासाठी जाहिराती देतात, त्यांना तर रिझर्व्ह बँकेची एवढीही बंधने नाहीत.)

---

### अमेरिकेत परदेशी भांडवलाचा ओघ

अमेरिकेतील बाजारपेठेचा फायदा उठविण्यासाठी परदेशातील भांडवल तेथे वाढत्या प्रमाणावर आकृष्ट होऊन गुंतविले जात आहे. १९६९ अखेर अशा रीतीने ८,८५० कोटी रुपये किंमतीचे भांडवल गुंतविले गेलेले होते; एकाच वर्षात त्यात ७५० कोटी रुपयांची भर पडली.

अमेरिकेचा विकास प्रारंभी परदेशी भांडवलामुळे आणि कारखानदारीमुळेच घडून आलेला आहे. पहिल्या महायुद्धापर्यंत अमेरिकेत परदेशी भांडवल येतच होते. त्यानंतर मात्र अमेरिकन भांडवल परदेशात जाऊ लागले, आणि निर्गत झालेल्या अशा खाजगी अमेरिकन भांडवलाची रक्कम आता ५२,५०० कोटी रुपये झाली आहे. सध्या अमेरिकेतील ७०० कारखान्यांची मालकी पूर्णतः किंवा जवळ जवळ पूर्णपणे ५०० परदेशी कंपन्यांकडे आहे. त्यातील काही कंपन्या खूप जुन्या आहेत. पण बहुसंख्य कंपन्या १९३० नंतरच्या आहेत. सर्वात जास्त भांडवल (२,६२५ कोटी रु.) ग्रेट ब्रिटनमधून आयात झालेले आहे. त्याखालोखाल कॅनडाचा (१,९५० कोटी रु.) क्रम लागतो. जपानी आणि जर्मन भांडवलाची अमेरिकेत गुंतवणूक वाढत चालली आहे. त्यांना मिळणारा नफा डिव्हिडंडच्या रूपाने अमेरिकेच्या बाहेर जाईल. त्याबरोबरच, ह्या भांडवलामुळे उत्पादनाची नवी तंत्रेही येतात. अमेरिकन लोकांना रोजगार मिळतो, अमेरिकेला करांचे उत्पन्न मिळते, वीज वाहतूक इत्यादींचे पैसे मिळतात, पूर्वी आयात होणाऱ्या जिनसा अमेरिकेत तयार होऊ लागतात.

## छोट्या नाण्यांची टंचाई दूर करण्याचे प्रयत्न

मुंबई येथील टांकसाळीत १० पैशांची नवी नाणी पाडण्यास प्रारंभ झाला आहे. ही नवी नाणी सध्याच्या नाण्यांपेक्षा वजनाने हलकी आणि आकाराने मोठी असतील. सध्याची नाणी पितळ अल्युमिनमची आहेत तर नवी केवळ अल्युमिनमची असतील. नव्या नाण्यासाठी लागणारा ठसा तयार करण्यात आला आहे. तो हैद्राबाद आणि कलकत्ता येथील टांकसाळींना देण्यात आल्यावर तेथेही नवी १० पैशांची नाणी पाडण्यास प्रारंभ होईल. चालू आर्थिक वर्ष संपण्याच्या सुमारास सर्व टांकसाळी मिळून ३० कोटी नवी नाणी पाडतील असा अंदाज आहे. नंतरच्या वर्षात नाण्यांचे उत्पादन पूर्ण क्षमतेने सुरू होईल व १०० कोटी नाणी पाडण्यात येतील. नव्या नाण्यांतील धातू त्याच्या दर्शनी किमतीपेक्षा कमी असल्याने ती भूमिगत होऊन अटवली जाण्याची शक्यता नाही. त्यामुळे सध्याची नाण्यांची टंचाई कमी होईल. सध्याच्या १० पैशांच्या नाण्याला कडेला आठ गोल कंगारे आहेत. नव्या नाण्याला १२ कंगोरे असतील. नवी नाणी टोकापासून टोकापर्यंत २६ मिलिमीटर असतील. सध्याची २३ मिलिमीटर आहेत. पण नव्या नाण्याचे वजन मात्र फक्त २·३ ग्रॅम असेल. सध्याच्या नाण्याचे वजन ४·२५ ग्रॅम आहे. ती आता पाडण्यात येणार नाहीत. नवी नाणी वजनाने हलकी असल्याने सार्वजनिक टेलिफोनच्या पेट्या, वजन करण्याची यंत्रे, काही मोठ्या रेल्वे स्टेशनावरील तिकिटे देण्याची यंत्रे, ही नाण्याच्या नव्या वजनाशी जुळवून घ्यावी लागतील. टेलिफोन खाते त्या दृष्टीने प्रयत्नशील झाले आहे. यंत्रात बदल करता यावा म्हणून टांकसाळीच्या अधिकाऱ्यांनी टेलिफोन खात्यात नव्या नाण्यांचा ठसा असलेल्या चकत्या आगाऊ पुरविल्या आहेत. वजन करण्याच्या यंत्रांतील बदल मात्र लगेच करता येणार नाही. कलकत्ता येथील टांकसाळीत काम चालू होईपर्यंत वाट पाहावी लागेल. कारण, ही यंत्रे तयार करण्याचा एकच एक कारखाना कलकत्त्यात आहे. यंत्राच्या उभ्या फटीत नाणी टाकून वस्तू देणाऱ्या यंत्रांतील बदलही त्वरित होणार नाही. अशी फारशी यंत्रे भारतात नाहीतच. मुंबई येथील बोरीबंदर स्टेशनवर तिकिटे देणारी काहीं यंत्रे बसविण्यात आली होती. पण ती नीट चालली नाहीत, आणि म्हणून ती काढून टाकण्यात येत आहेत.

### नाणे टंचाई तावडतोब संपणार नाही

१० पैशांची नवी नाणी लवकरच वापरात येऊ लागतील. पण त्यांची टंचाई मात्र पुढील आर्थिक वर्षातच कमी होऊ लागेल. त्या सुमारास टांकसाळींतून सर्व प्रकारची २०० कोटी नाणी पाडण्यात येऊन व्यवहारात येतील. चालू आर्थिक वर्षात सुमारे १६० कोटी नाणी वापरात येतील. रिझर्व्ह बँकेने १८५ कोटी नाण्यांची मागणी केली आहे. चालू वर्षात टांकसाळींकडे निरनिराळ्या नाण्यांची मागणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| नाणी | संख्या |
|---|---|
| ५० पैशांची | ७ कोटी |
| २० ,, | १७ ,, |
| १० ,, | ५९·५ ,, |
| ५ ,, | ४२·३ ,, |
| ३ ,, | १२ ,, |
| २ ,, | ३७·२ ,, |
| १ ,, | १० ,, |

१० पैशांची नाणी सोडून इतर नाण्यांचे उत्पादन तिन्ही टांकसाळी मागणीप्रमाणे करू शकतील. १० पैशांची नवी नाणी मात्र मागणीपेक्षा कमी पडणार आहेत. कारण, १९७२ च्या मार्चअखेर ३० कोटी नाण्यांपेक्षा अधिक नाणी पाडता येणे शक्य होणार नाही. रिझर्व्ह बँकेची मागणी ५९·५ कोटी नाण्यांची आहे. त्यांची टंचाई थोडीबहुत कमी व्हावी म्हणून चालू वर्षाच्या आरंभी चालू १० पैशांची नाणी पाडण्यात आली व ५ पैशांची अल्युमिनमची नाणी पाडण्यात आली. भारतात अल्युमिनम-मॅग्नेशिअम ह्या मिश्र धातूंची नाणी अधिकाधिक पाडण्यात येत आहेत. हा मिश्र धातू नाणी पाडण्यास सोपा असा आहे. त्यामुळे टांकसाळींना नाणी पाडणे सुकर होते. १९७२–७३ पर्यंत सर्व प्रकारची २०० कोटी नाणी पाडून मागणी पुरी करता येणे टांकसाळींना शक्य आहे. १९६७–६८ साली टांकसाळींचे उत्पादन कळसाला पोचले होते. त्या वर्षी १८४·५ कोटी नाणी पाडण्यात आली. १९६८–६९ साली १४२·५ कोटी नाणीच पाडण्यात आली आणि १९६९–७० साली तर अवघी ३८·६ कोटी नाणी पाडण्यात आली त्या वेळी टांकसाळींच्या खजिन्यात आणि रिझर्व्ह बँकेजवळ नाण्यांचा खूप मोठा साठा असल्याने टांकसाळींत जादा कामाचे तास कमी करण्यात येऊन उत्पादन कमी करण्यात आले. काही दिवसांपूर्वी एका राजकीय पक्षाने रिझर्व्ह बँकेवर मोर्चा नेऊन इतर अनेक मागण्यांत १० पैशांची नवी नाणी पाडण्याची मागणी केली होती. रिझर्व्ह बँकेचे म्हणणे असे आहे की नाण्यांचा तुटवडा कृत्रिम रीत्या उत्पन्न झालेला आहे. त्यांच्याशी बँकेचा काही संबंध नाही. रिझर्व्ह बँकेमार्फत नाणी फक्त वाटली जातात; नाणी पाडण्याचे काम रिझर्व्ह बँकेचे नसून टांकसाळींचे आहे आणि त्या मध्यवर्ती अर्थखात्याच्या अखत्यारात असतात. मुंबईच्या बेस्ट वाहतूक कंपनीने काढलेल्या कुपन्सना चलनी पैसा म्हणता येणार नाही. कारण ही कुपन्स बसची तिकिटे घेण्यासाठीच फक्त वापरली जातात. कुपन्स खरेदी केली म्हणजे आगाऊ तिकिटे घेतली, असे फार तर म्हणता येईल.


**अर्थ दिवाळी अंक, १९७१**

"अर्थ" चा ३७ वा वार्षिक दिवाळी अंक २० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होईल. आमच्या हितचिंतकांनी आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या, अशी विनंती आहे.

द. रा. कुलकर्णी
व्यवस्थापक

# स्वस्तिक-महाराष्ट्र बँक विलिनीकरणास हायकोर्टाची मंजुरी

## स्वास्तिकला सुमारे १.७५ कोटी रुपयांचे भांडवल मिळणार. विस्ताराच्या योजनांचे श्री. वसंतराव वैद्य ह्यांनी केलेले दिग्दर्शन



मध्यभागी सौ. जयश्रीबाई वैद्य (डायरेक्टर) आणि श्री. वसंतराव वैद्य (जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर) १. वाय. डी मेहेंदळे (फॅक्टरी मॅनेजर). २. व्ही. बी. बेनाडीकर (बिझिनेस मॅनेजर) ५. जी. के. पंडित (सेक्रेटरी) ६. एम. व्ही. गोखले (असिस्टंट सेक्रेटरी)

दि बँक आफ महाराष्ट्र लि. आणि स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. ह्यांच्या विलिनीकरणाच्या योजनेस गेल्या आठवड्यात मुंबई हायकोर्टाचे मान्यता दिली. स्वस्तिकचे अधिकृत भांडवल वाढवून नवे इक्विटी आणि प्रेफन्स भाग व डिबेंचर्स काढण्यास, त्याचप्रमाणे त्या भागांचे लहान रकमेच्या भागात रूपांतर करण्यास संमती देणारे ठराव स्वस्तिकच्या भागधारकांच्या सभेने मंजूर केलेले आहेतच. त्यास कॅपिटल इश्यूज कंट्रोल ॲक्ट, १९४७ प्रमाणे मध्यवर्ती सरकारची परवानगी आवश्यक असते. हायकोर्टाची मंजुरी मिळाल्यानंतर ही परवानगी आता दोन-तीन आठवड्यांत हाती यावी, अशी अपेक्षा आहे. ज्या दिवशी ही परवानगी मिळेल, त्या दिवसापासून (इफेक्टिव्ह डेट) विलिनीकरणाची योजना पूर्णपणे अमलात येईल. १ जुलै १९७१ पासूनच (अपॉईंटेड डेट) दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. स्वस्तिकसाठी आणि तिच्या वतीने कामकाज करीत आली आहे. दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या भागधारकांना स्वस्तिकचे भाग, डिबेंचर्स आणि रोख रकम मागणीप्रमाणे देण्याची पूर्वतयारी सुरू झाली आहे. ज्यांनी रोख रकम मागितली आहे, त्यांना ती 'इफेक्टिव्ह डेट' पासून एक महिन्यात मिळावयाची आहे. दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या ९०% पेक्षा जास्त भागधारकांनी स्वतःच्या भागांचे स्वस्तिकच्या भागांत रूपांतर करून मिळण्यास मान्यता दिली आहे; १०% पेक्षाही कमी भागधारकांनी भागांची रोख रकम मागितली आहे, तीही बहुधा, बहुंशी, गरजेच्या खर्चासाठीच असावी.

राष्ट्रीयीकृत बँकिंग कंपन्यांच्या औद्योगिक कंपन्यांतील विलिनीकरणाच्या कित्येक योजना हायकोर्टापुढे आहेत; दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. आणि स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. ह्यांच्या विलिनीकरणाची योजना हायकोर्टाने मंजूर केली आहे, ती मंजुरी मिळणारी पहिलीच योजना आहे. कारण, ज्या कंपनीत विलिनीकरण करण्यात येत आहे ती कंपनी म्हणजे स्वस्तिक, कंपनी कायद्याच्या व मोनॅपोलीज कायद्याच्या सर्व तरतुदीतून उत्तीर्ण झाली आहे. ह्या अपूर्व शुभ घटनेची स्वतःच्या भागधारकांना, ठेवीदारांना, महाराष्ट्र बँकेच्या भागधारकांना आणि सर्वसाधारण जनतेला योग्य माहिती व्हावी आणि स्वस्तिकच्या प्रगतीची कल्पना यावी ह्यासाठी कंपनीचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वसंतराव वैद्य ह्यांनी एक पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्या वेळी डायरेक्टर सौ. जयश्रीबाई वैद्य आणि कंपनीचा वरिष्ठ अधिकारी वर्ग उपस्थित होता.

श्री. वसंतरावांनी आपल्या प्रास्तविक भाषणात वरील माहिती दिली आणि त्यानंतर पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली, त्यांतील काही महत्त्वाची उत्तरे येथे दिली आहेत :—

(१) महाराष्ट्र बँक आणि स्वस्तिक कंपनी ह्या दोन्ही कंपन्यांच्या भागधारकांनी विलिनीकरणास एकमताने मान्यता दिली होती. हायकोर्टात मंजुरीसाठी ही योजना गेली, तेव्हा दोन्ही कंपन्यांच्या भागधारकांना विरोध दर्शविण्यास पुनः संधी होती. परंतु तसे करण्यासाठी एकही अर्ज आला नाही. एका अर्जदाराने, रोख रकमेची मागणी करण्यास आपणास विलंब झाला तेव्हा तो विलंब माफ करावा, अशी हायकोर्टास विनंती केली, ती हायकोर्टाने मान्य केली.

(२) दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ही आता बँक उरलेली नसल्यामुळे तिने तिला मिळालेल्या रोख्यांचे पैसे वेगवेगळ्या बँकांत ठेव म्हणून ठेवले आहेत. त्या ठेवींच्या जरूर तेव्हा रोख रक्कम घेता येईल आणि त्यातून बँकेच्या भागधारकांना स्वस्तिकचे भाग, डिबेंचर्स आणि रोख रक्कम, आधी मागणी केली असेल त्याप्रमाणे, देता येईल.

(३) स्वस्तिकला मिळणाऱ्या नव्या भांडवलाचा उपयोग मुख्यत्वेकरून चालू उत्पादनाचा विस्तार करण्याकडे आणि स्वस्तिक पादत्राणांची किरकोळ विक्रीची दुकाने वाढविण्याकडे केला जाईल.

(४) स्वतःची विक्रीची दुकाने असण्याचा फायदा असा की, स्वस्तिक घाऊक खरेदीदारांना जे कमिशन देते, त्यापेक्षा कमी खर्चात कंपनीच्या पादत्राणांची मोठ्या प्रमाणावर विक्री करता येते. अशा दुकानांची संख्या येत्या दोन-तीन वर्षांत सात-आठ पट करण्याचा आमचा विचार आहे. ह्या दुकानांमुळे स्वस्तिकचा गिऱ्हाइकांशी प्रत्यक्ष संबंध पोचतो; स्वस्तिकची जाहिरातही आपोआप होते.

(५) निर्गत व्यापारास आम्हांला भरपूर वाव आहे. त्याचप्रमाणे संरक्षण खात्याकडेही आमचा माल मोठ्या प्रमाणावर जातो. त्यामुळे आम्हांला ऑर्डरींचा तुटवडा नाही; त्या पुऱ्या कशा करता येतील हा आमचेपुढील प्रश्न आहे. नव्या भांडवलामुळे आमचे उत्पादन अधिक वाढविता येणे सुलभ होईल.

(६) स्त्रियांची नव्या नव्या फॅशन्सची पादत्राणे बनविण्यावर आम्ही मुद्दामच भर देत नाही. कारण, फॅशन्स फार लवकर बदलत जातात आणि उत्पादनाला गती येण्यापूर्वीच नव्या फॅशन्स आलेल्या असतात.

(७) पॅकिंगच्या कागदी पेट्या मजबूत आणि आकर्षक करण्याचा आमचा सतत प्रयत्न असतो. कारण, उत्कृष्ट दर्जाचा माल पॅकिंग सदोष असल्यास वाया जातो.

(८) आम्ही इतर काही प्रथितयश कारखानदारांसाठीही माल बनवून देतो आणि ते तो त्यांचा माल म्हणून विकतात. स्वस्तिकच्या बनावटीच्या उत्कृष्ट दर्जाचा हा उत्तम पुरावा आहे.

(९) महाराष्ट्रातील चिकित्सक आणि स्वतःच्या हितास जागरूक अशा जनतेने महाराष्ट्र बँकेच्या स्वस्तिकशी विलिनीकरणास जो एकमुखी पाठिंबा दिला आणि आमच्या कल्पनेपेक्षा कितीतरी जास्त भागधारकांनी किती तरी जास्त रकमेचे स्वस्तिकचे शेअर्स व डिबेंचर्स घेण्याचे ठरविले, त्याबद्दल स्वस्तिकतर्फे मी धन्यवाद देतो. पैशांच्या भांडवलाइतकेच सुबुद्ध जनतेच्या आपुलकीचे अदृश्य भांडवल महत्त्वाचे आणि सुपरिणामी असते, अशीच माझी भावना आहे.

---

## परदेशी प्रवासाला जाणाऱ्या जपानी लोकांना हे शिकवावे लागते !

जपानी लोक घरी कितीही टापटिपीने राहात असले, तरी परदेशात गेल्यावर त्यांचे वागणे बदलते. १० लक्ष जपान्यांनी गेल्या वर्षी परदेशप्रवास केला; १९७१ मध्ये त्यांची संख्या १३ लक्षांवर जाईल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे त्यांचे वागणे जास्तच ठिकाणी इतरांना खुपण्याचा संभव आहे. तेव्हा, जपानची राष्ट्रीय प्रतिमा बिघडू नये ह्यासाठी जपानी प्रवासी एजन्सीज व जपानच्या सरकारचे परदेश खाते ह्यांनी संयुक्तपणे एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे, ती मोफत दिली जाते. "ज्या ठिकाणी जाल, तेथे तिथल्याप्रमाणे वागा" असे पंतप्रधान सॅटो ह्यांनी आपल्या प्रस्तावनेत म्हटले आहे.

ह्या पुस्तिकेत करण्यात आलेल्या सूचनांपैकी काही सूचना खालील प्रमाणे आहेत :— जपानमध्ये आगगाडीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासात फक्त अंडरवेअर ठेवून वावरण्याची पद्धत पाश्चात्य देशात गेल्यावर बंद केली पाहिजे. हॉटेलमधील जाण्या-येण्याच्या वाटेत अंडर पँटमधे हिंडणेही थांबवले पाहिजे. टोकियो-मध्ये स्त्रियांना बाजूला सारून लिफ्टमध्ये बसण्यात गैर वाटत नसले, तरी पाश्चात्य देशात त्यावर प्रतिकूल टीका होईल. विमानातील शौचगृहाच्या बाहेर "रिकामा नाही" अशी पाटी असेल, तर थोडा वेळ थांबा, आत गेल्यावर आतून दरवाजा बंद करायला विसरू नका. संडास वापरून झाल्यावर पाणी सोडा. एखाद्या गल्लीत किंवा पुलाच्या कोपऱ्यात लघुशंकेला बसू नका, तसे केल्यास पोलीस खटला भरतील. टबात स्नान करा, बाहेर पाणी सांडू नका. तुम्ही पोटाला बांधलेल्या कापडी पट्ट्यात पैसे ठेवू नका, कारण ते पैसे काढण्यासाठी प्रथम विजार खाली उतरवावी लागते !

---

## पोस्ट-कार्डाची लांबी-रुंदी कमी

"पोस्ट-कार्डाचा आकार येत्या दोन महिन्यांत न वाढविल्यास मला सरकारविरुद्ध न्यायालयात जावे लागेल," असा इशारा देणारी नोटीस भुसावळ व जळगाव येथील एक कायदेपंडित श्री. जी. एस. रायसिंगानी यांनी संबंधित खात्याला पाठविली आहे. या नोटिसीमध्ये श्री. रायसिंगानी म्हणतात, "भारतीय सिव्हिल प्रोसिजर कोडच्या ८० व्या कलमानुसार पोस्ट-कार्डाची लांबी व रुंदी अनुक्रमे ५·८ इंच आणि ३·८ इंच असणे आवश्यक आहे. तथापि सध्या पोस्ट-कार्डाची लांबी ५·६ इंच आणि रुंदी ३·५ इंच आहे. पोस्ट-कार्डाची किंमत दहा पैसे आकारण्यात येते; पण कार्डाचा आकार लहान असल्यामुळे आम्हां नागरिकांना मात्र नुकसान सहन करावे लागते."

## 'जस्टिस ऑफ दि पीस'ची संख्यावाढ

बृहन्मुंबईमध्ये सध्या १,९२४ 'जस्टिस ऑफ दि पीस' आहेत. उपनगरात त्यांची संख्या पुरेशी नाही, अशा तक्रारी आल्यामुळे तेथील 'जस्टिस ऑफ दि पीस'ची संख्या वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. काही जादा उत्साही लोकांनी ह्या पदासाठी 'अर्जां'चे सायक्लोस्टाईल केलेले फॉर्म वाटले आहेत, असे सरकारच्या निदर्शनास आले आहे.

---

## मुलींचा अनैतिक कारणासाठी वापर

मुलींचा आणि स्त्रियांचा अनैतिक कारणासाठी वापर वाढत असल्याचे बृहन्मुंबईत आढळून आले आहे. जुलै १९७१ अखेर पोलिसांनी अशा ११६ मुलींची सुटका केली. १९७०-७१ मध्ये पोलिसांनी ७९ मुलींची आणि १९६९-७० मध्ये २१ मुलींची सुटका केली होती.

---

## अजिंक्यपद मिळविणारी मुलगी, मुलगा निघाली!

उत्तर सुमात्राच्या मुलींच्या बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद मिळविणारी मुलगी ही वास्तविक मुलगा असल्याचे आढळून आल्यामुळे तिचे अजिंक्यपद रद्द करण्यात आले आहे. तिचा तडफदार खेळ पाहून स्पर्धेच्या अधिकाऱ्यांना अचंबा वाटला होता. त्यांनी नंतर तिच्या पालकांच्या छेडले, तेव्हा सत्य बाहेर आले. आपल्या जुळ्या बहिणीच्या ऐवजी हा जुळा भाऊ खेळत होता.

## मुंबईमधील रस्त्यांवरील अपघाती मृत्यू

एप्रिल ते जून, १९७१ ह्या तिमाहीत मुंबईमधील रस्त्यावरील अपघातांत १४१ लोक मृत्यू पावले. म्हणजे, प्रत्येक आठवड्याला ११ मृत्यू असे प्रमाण पडले.

---

## बँकेच्या खातेप्रमुखाविरुद्ध वॉरंट


रामदास राघवेंद्र कामत हा इंडियन ओव्हरसीज बँकेच्या मुंबईमधील शाखेच्या फॉरिन एक्सचेंज खात्याचा प्रमुख होता. बनावट कागदपत्रे करून त्याने सिंगापूरला पैसे पाठवून सरकारची फसवणूक केली. सिंगापूरहून मुंबईला पाठविलेल्या शेळ्या आणि मेंढ्या ह्यांच्या किमतीसाठी रक्कम पाठविली जात असल्याचे खोटे कागदपत्र त्याने बनविले. १९६६ मध्ये त्याने काही जणांच्या संगनमताने हे घडवून आणले. कामतला पकडण्यासाठी २,००,००० रुपयांच्या जामीनकीचे पकड-वॉरंट मॅजिस्ट्रेटने दिले. फसवणुकीची रक्कम ४,८०,००४ रु. आहे.

---

## "मटका कायदेशीर करा"

"मटका थांबविण्यास पोलीस असमर्थ ठरले आहेत, तेव्हा तो कायदेशीर करावा. त्यामुळे महाराष्ट्र सरकारला दरसाल २५ कोटी रु. चे उत्पन्न मिळेल. त्यातून दरसाल ५,००,००० लोकांना राहण्याचे गाळे बांधून देता येतील" असे भूतपूर्व असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस, श्री. पी. आर. राणे ह्यांनी म्हटले आहे.


किर्लोस्कर एंजिन
साठी
बँक कर्ज-योजनेचा
फायदा घ्या



तुम्ही फक्त थोडी रक्कम रोख भरायची. बाकीचे पैसे बँक कर्जाऊ देते.

आपल्या नजीकचा किर्लोस्कर विक्रेता
याबाबतीत सर्व मार्गदर्शन व मदत देईल.

किर्लोस्कर
दर्जेदार डिझेल एंजिनाचे उत्पादक
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड
खडकी, पुणे-३ (भारत)

Tom & Bay/KO-7085-M

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

## काळा बाजार आणि तोही मुलांचा

टंचाई ही काळया बाजाराची जननी आहे आणि टंचाई केव्हा व कशाची निर्माण होईल हे सांगता येत नाही. भारतात माणसे सोडून सर्वांचीच टंचाई आहे. अमेरिका हा देशही टंचाईच्या आपत्तीत सापडला आहे. पण, ही टंचाई माणसांची म्हणजे दत्तक म्हणून पाळण्यासाठी हव्या असलेल्या मुलांची आहे. अर्थातच तेथे मुलांचा काळाबाजार नव्याने अस्तित्वात आला आहे. एकदा अशी स्थिती होती की एखादी अविवाहित मुलगी माता होण्याचा संभव दिसताच येणाऱ्या जिवाची दत्तविधानाची सोय आधीच होत असे. पण आता काळ पालटला आहे. अमेरिकेतील अनेक राज्यांत भ्रूणहत्या कायदेशीर करण्यात आली आहे. शिवाय, कुमारी मातांनी आपल्या अपत्यांचे संगोपन करण्याची प्रथाही रूढ झाली आहे. परिणामी, दत्तक घेण्यासाठी मुले मिळणे अवघड झाले आहे. एका तरुण अमेरिकन दांपत्याने ३,३०० डॉलर्स मोजून एक छोटी मुलगी आपली म्हणून पाळण्यास मिळविली. तीन-चार शतकांपूर्वी जगात गुलामांचा बाजार चालू होता; आता अमेरिकेत मुलांचा बाजार आणि तोही काळा व छुपा चालू झाला आहे. शिकॅगो येथील एका वकिलाची डॉक्टर लोकांशी आणि अविवाहित मातांशी चांगली घसट होती. त्याने १९६० साली ५५ जोडप्यांना दत्तक मुले पुरविली आणि ह्या सत्कार्यासाठी मामुली फी आणि मातांसाठी खर्च होणारी वैद्यकीय फी ह्याशिवाय प्रत्येक दत्तक मुलामागे ३ हजार डॉलर्स घेतले. आपल्या मागे आपले नाव चालविणारे कोणी तरी असावे ह्या इच्छेचा फायदा घेऊन वकील महाशयांनी १ लाख, ६५ हजार डॉलर्सची बेकायदा फी मिळविली !

## हवाई सुंदरी आणि विवाह

भारतात हवाई सुंदरी म्हणून काम करणाऱ्या तरुणींना वयाच्या ३० वर्षी सेवानिवृत्त व्हावे लागते. त्यापूर्वी त्यांनी विवाह केल्यासही त्यांना हाच मार्ग पत्करावा लागतो. इंडिअन एअर लाइन्सच्या विमानात काम करणाऱ्या हवाई सुंदरींना दरमहा ३८५–७७० रु. अशी वेतनश्रेणी असते आणि एअर इंडिआत काम करणाऱ्या तरुणींना दरमहा ४८५–७७० रु. अशी वेतनश्रेणी मिळते. त्याशिवाय त्यांना नेहमीचे भत्ते व रजेसकट इतर सवलती, मोफत अगर सवलतीच्या प्रवासाची तिकिटे, वैद्यकीय खर्च, ग्रॅच्युइटी, इत्यादी फायदे मिळतात. परदेशातून बऱ्याच विवाहित स्त्रियांनाही हवाई सुंदरी म्हणून काम करता येते; त्यांची कार्यक्षमता कमी झाल्याचे आढळून आलेले नाही.

## ब्रुकबाँडचे २०% डिव्हिडंड

ब्रुकबाँड कंपनीने २६ जून, १९७१ अखेर संपलेल्या वर्षासाठी २०%डिव्हिडंड जाहीर केले आहे. कंपनीची विक्री ८५·५६ कोटी रु. वरून ९४·२७ कोटी रु. वर गेली. करपात्र नफा ४·६९ कोटी रु. झाला. कंपनीच्या १० रु. च्या भागाची किंमत २७·७५ रु. आहे.

## निर्वासितांवरील खर्चामुळे मदत निरुपयोगी

बांगला देशामधील अनन्वित अत्याचारामुळे भारतात स्थलांतर करणाऱ्या निर्वासितांचा ओघ चालू आहे. त्यांना अन्नवस्त्र व निवारा पुरविण्यासाठी भारत सरकारला रोज २॥ कोटी रुपये खर्च करावे लागत आहेत. ह्या अवाढव्य खर्चाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर घातक परिणाम होत आहे. जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी असा अंदाज केला आहे की, निर्वासितांपायी भारताला दरसाल ८ कोटी डॉलर्सपासून १०० कोटी डॉलर्सपर्यंत खर्च करावा लागेल. बांगला देशातील घटनांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल ह्याची कल्पना करून घेण्यास जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. मॅकनामारा उत्सुक आहेत. त्यांना ह्याविषयी फार चिंता वाटत आहे. बँकेच्या तज्ज्ञांनी केलेल्या संबंधित अहवालावर बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चर्चा केली. बँकेने केलेल्या खर्चाच्या अंदाजात अनुषंगिक खर्चाच्या बाबींचा विचार केलेला नाही. उदाहरणार्थ, निर्वासितांना ठिकठिकाणच्या कँपमधून हलविण्याचा खर्च. असेही सांगण्यात आले की भारतावर पडत असलेल्या ह्या खर्चाच्या प्रचंड भारामुळे चालू वर्षी भारताला जी परदेशीय आर्थिक मदत मिळणार आहे ती न दिल्यासारखीच होणार आहे. कारण सर्व मदत निर्वासितच फस्त करून टाकतील. अशा परिस्थितीत भारताला गंभीर स्वरूपाच्या चलनवृद्धीला तोंड द्यावे लागेल आणि त्याच्या विकासाच्या कार्यक्रमाला फार मोठा धक्का बसेल. शिवाय, निर्वासितांमुळे सामाजिक स्वरूपाचे बिकट प्रश्न उद्भवणार आहेत. भारतात आलेल्या १ कोटी निर्वासितांना कामधंदा मिळाला नाही तर ती फार मोठी आपत्ती ठरेल.

## निर्गतीचे उत्पन्न कर्जखातीच खर्च होते

भारताने परदेशांकडून घेतलेल्या कर्जावर त्याला व्याज द्यावे लागते, काही कर्जफेडीचे हप्तेही द्यावे लागतात. अर्थात भारताच्या निर्गतीमधून ह्याची रक्कम देता येते. एकूण निर्गतीशी ह्या व्याज-कर्जफेडीचे प्रमाण १९६५ मध्ये १६·५% होते, १९६९ मध्ये २२% वर गेले. ह्याचा अर्थ, निर्गतीपैकी फार मोठा भाग व्याज आणि कर्जफेडच खाऊन टाकत आहे आणि हे प्रमाण वाढतच जाईल, अशी भीती वाटते. कारण विकसनशील देशांना आपली परंपरागत निर्गत वाढविता येण्याची शक्यता फार कमी दिसत आहे, असे जागतिक बँकेने म्हटले आहे.

## हिशेब तपासण्याचे काम वाटले जावे

काही थोड्या चार्टर्ड अकौंटंटसकडेच बहुतेक सर्व काम जाते. तेव्हा, प्रत्येक चार्टर्ड अकौंटंटने किती काम पत्करावे ह्याची कमाल मर्यादा ठरविण्यात यावी, ह्या व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे, अशी तरुण चार्टर्ड अकौंटंटसची मागणी आहे. " वेस्टर्न इंडिया यंग चार्टर्ड अकौंटंट्स फोरम " नावाची संघटना ते स्थापन करणार आहेत.

## सार्वजनिक विभागात काम करणारे मॅनेजर्स

सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक व इतर संघटनांत काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविषयी लोकसभेत प्रश्न विचारण्यात आले असता पुढील माहिती देण्यात आली. १९७० च्या अखेरीस अशा संघटनांत काम करणाऱ्या एकूण उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची संख्या १९७ होती. ह्या संख्येत आय. सी. एस. अधिकाऱ्यांचा समावेश नाही. ह्या वरिष्ठ जागा सरकारी अगर निमसरकारी संघटनांत काम करणाऱ्या लोकांतून भरण्यात आलेल्या आहेत. त्यांची वर्गवारी करता असे दिसते की काही जागा आय.सी.एस. व आय. ए. एस. सेवांतून भरण्यात येतात. हे अधिकारी उसने म्हणून पाठविलेले असतात. काही जागांवर इंडस्ट्रिअल मॅनेजमेंट ह्या सेवेतील अधिकारी उसने म्हणून पाठविले जातात आणि काही जागा सरळ भरती करून भरण्यात येतात. एकूण वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी आय. सी. एस., आय. ए. एस. आणि इतर सेवांतून तात्पुरते म्हणून कामे करण्यास गेलेल्या अधिकाऱ्यांची संख्या ६८ आहे. इंडस्ट्रिअल मॅनेजमेंट पूलमधून १० अधिकारी उसने देण्यात आले. ८६ वरिष्ठ अधिकारी संबंधित औद्योगिक संघटनांनी सरळ भरती केलेले आहेत. त्यात १४ सेवानिवृत्त सरकारी अधिकारी आहेत. काही मुलकी खात्यातील व काही संरक्षण खात्यातील आहेत ह्या जागांसाठी अधिकारी नेमताना ज्या अधिकाऱ्यांनी औद्योगिक, व्यापारी अगर वित्तीय क्षेत्रात कार्यक्षमता दाखविलेली असेल, त्यांनाच नेमण्याचे सरकारचे धोरण आहे.

## नद्यांचे पाणी दूषित करण्याविरुद्ध इशारा

वाढत्या औद्योगीकरणाबरोबर हवापाणी दूषित होत जाते हे प्रगत देशांतील अनुभवावरून माहीत झाले आहे. हा धोका आता भारतातही स्पष्ट होऊ लागला आहे. सेंट्रल पब्लिक हेल्थ एंजिनिअरिंग ह्या संस्थेने दामोदर नदीच्या दूषित होत असणाऱ्या पाण्याबाबत धोक्याचा इशारा दिला आहे. पश्चिम बंगालमध्ये दुर्गापूर-असनसोल भागात दामोदर नदीच्या तीरावर ८ मोठे उद्योगधंदे आहेत. हे सर्व उद्योगधंदे मिळून १० लाख लोकवस्तीचे शहर जितके घाण व दूषित पाणी नदीत सोडते तितके पाणी कारखानेही नदीच्या पात्रात सोडत असतात. नदीच्या काठावरील कारखाने दररोज १·५९ लाख घनमीटर दूषित पाणी सोडतात, असा अंदाज संस्थेने केला आहे. ह्या पाण्यामुळे काठावरील विभागांतील लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळणे कठीण होत चालले आहे. नदीच्या पाण्यात मासे जिवंत राहू शकत नाहीत. दूषित पाणी नदीत सोडण्यापूर्वी त्याचा घातकपणा काढून टाकण्यासाठी योजलेले उपाय अपुरे आणि असमाधानकारक आहेत. ह्या उद्योगधंद्यांत गुंतलेल्या एकूण भांडवलाच्या मानाने दूषित पाणी शुद्ध करण्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक मोठी नाही. एकूण भांडवलाच्या ०·४ टक्के एवढा पैसा गुंतविला तरी हे काम होण्यासारखे आहे. दुर्गापूर-आसनसोल विभागात आणखी काही कारखाने उभारण्यात येत आहेत. त्यांत एक खताचा कारखाना आणि एक रासायनिक कारखाना आहे. शिवाय आणखी काही कारखाने आहेत. त्यांचे दूषित पाणी नदीत सोडण्यात येऊ लागल्यावर परिस्थिती अधिकच वाईट होईल.

## वीस रुपयांची नवी नोट

अर्थखात्याने २० रुपयांची नवी नोट व्यवहारात आणण्याची सूचना केली होती. तिला मध्यवर्ती सरकारने मान्यता दिली आहे. ह्या नव्या नोटा किती छापावयाच्या त्याचा विचार अर्थखाते रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून ठरविणार आहे. नव्या नोटा लवकर काढण्यात येतील असा समज पसरला होता. परंतु तो बरोबर नाही. २० रुपयांच्या नोटा पुढील वर्षाच्या प्रारंभी वापरात येऊ लागतील. अर्थखात्याने नव्या नोटांचा नमुना मंजूर केला आहे. त्याचा रंग विटकरी असेल. त्यावर एका बाजूला लोकसभेच्या इमारतीचे चित्र असेल आणि दुसऱ्या बाजूला २० रुपयांचा आकडा असेल. नोटा छापण्याची नवी यंत्रसामग्री मिळविण्यात आली आहे. तीमुळे नोटांवरील नंबर चुकणार नाहीत. शिवाय खोट्या नोटा तयार करणेही अवघड जाणार आहे.

## कॅन्सरवरील संशोधन

कॅन्सर ह्या रोगावर अचूक असे औषध अद्याप सापडलेले नाही. काही प्रकारच्या कर्करोगात तर ८५ टक्के रोगी हमखास दगावतात. माणसाच्या मृत्यूला कारणीभूत होणारा हा सर्वात जबरदस्त रोग आहे. म्हणूनच त्यावरील औषधाचे संशोधन सर्व जगभर चालू आहे. अमेरिकेतील शास्त्रज्ञ सरकारच्या मदतीने औषधासंबंधी संशोधन करीत आहेत. संशोधनाच्या कार्यात आता तैवानमधील फुलपाखरे आणि उत्तर-ध्रुव विभागातील मासे ह्यांचा उपयोग करण्यात येणार आहे. काही शास्त्रज्ञांना चंद्रावरून आणलेल्या मातीचा ह्या कामी उपयोग होईल अशी उमेद वाटत आहे. ते चंद्रावरील मातीच्या जातींपैकी काही जातींच्या साह्याने संशोधन करणार आहेत.

## रशिआत शिक्षणासाठी जाणाऱ्यांची संख्या

भारत आणि रशिआ ह्या दोन देशांत शास्त्र, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक सहकार्याचा करार १९६० च्या फेब्रुवारी मध्ये करण्यात आलेला आहे. तेव्हापासून रशिआत अनेक स्तरांवर शिक्षण घेण्यासाठी हिंदी नागरिक गेले आहेत. त्यांच्या संख्येविषयी लोकसभेत माहिती विचारण्यात आली असता शिक्षण व समाजहित खात्याचे मंत्री श्री. यादव ह्यांनी अशी माहिती दिली. रशिआत शिक्षणासाठी गेलेले :

| | |
|---|---|
| अंडर ग्रॅज्युएटस् | ० |
| पदव्युत्तर विद्यार्थी | ४ |
| संशोधक | २३३ |
| उच्च विशेष ज्ञानाचे संशोधक | ५७ |
| रशिअन भाषेतील भाषांतराचे कसब शिकण्यासाठी गेलेले | ३ |
| | २९७ |

## कुत्र्यावरील प्रेमाची अजब कहाणी

हिंदू धर्मात प्राणिमात्रावर प्रेम करा, असा उपदेश केलेला आहे. भगवान बुद्धाने तर अहिंसा हा धर्माचा पाया करून चराचर जीवसृष्टीविषयी जिव्हाळा उत्पन्न करण्याचा प्रयत्न कसोशीने केला. हिंदुस्थानात विचार आणि आचार ह्यांमधील तफावत प्रत्येक क्षेत्रात खूप आहे. तशी ती प्राणिसृष्टीवरील प्रेमाच्या बाबतीतही आहे. मद्रास येथील एका अपत्यहीन जोडप्याने मात्र त्यांनीं पाळलेल्या श्वानावर पुत्रनिर्विशेष प्रेम केले. कुत्र्याचे नाव होते बॉक्सर. त्या कुटुंबातील एक घटक म्हणून हा कुत्रा १२ वर्षे वावरला आणि नुकताच मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर उभयता पतिपत्नींना अनिवार शोक झाला आणि त्यांनी त्याचा हिंदु धर्माप्रमाणे दफनविधी केला. त्याला पुरण्यासाठी खास परवानगी घ्यावी लागली. त्याचा १६ वा दिवसही रीतसर पाळण्यात आला ह्या दांपत्याचे नाव आहे श्री. नारायण: आणि श्रीमती सावित्री, दोघांचेही कुत्र्यावर जिवापलीकडे प्रेम होते, इतके की सिनेमा सारख्या ज्या ठिकाणी कुत्र्यांना बरोबर घेऊन येण्यास मनाई असे अशा ठिकाणी ते दोघे कधी गेलेच नाहीत. कारण, त्यांना "मुला"ला सोडून जाणे पटत नव्हते. बॉक्सरची स्मृती कायम राहावी म्हणून त्याच्या दफनभूमीवर त्याच्या जन्ममृत्यूचा कालदर्शक दगडही बसविण्यात आला आहे. दगडावर "हा आम्हाला मुलापेक्षाही प्यारा होता" असे खोदण्यात आले आहे. शिवाय मद्रास येथील कुत्र्यांच्या निवासस्थानाला १,००१ रुपयांची देणगीही पतिपत्नींनी दिली आहे. कुत्रा माणसाशी इमानदार राहतो; माणूस कुत्र्याशी इमान राखण्याचे दृश्य विरळाच.


---

## ल्यूना—नवी मोपेड

नवीन ल्यूना मोपेड स्कूटर थोड्या महिन्यात बाजारात मिळू लागेल. ती सर्व भारतीय बनावटीची असेल. ५० सी.सी. टू स्ट्रोक एअरकूल इंजिने असलेल्या ह्या गाडीची फॅक्टरीच्या दाराशी किंमत १,३०५ रु. असेल.

प्रत्येक लिटर पेट्रोलवर ती ६० किलोमीटर धावू शकेल. टँकमध्ये २·५० पेट्रोल मावेल. ताशी तिचा वेग ४० किलोमीटर पर्यंत पोचू शकेल. 'ल्यूना' ला गिअर्स असणार नाहीत; फक्त ॲक्सिलरेटर आणि ब्रेक असतील. ती पाय मारूनही चालविता येईल. तिचे वजन कमी असावे ह्यासाठी तिचे काही भाग प्लॅस्टिकचे बनविलेले असतील. पुण्याच्या कायनेटिक इंजिनिअरिंग कंपनीच्या अहमदनगर येथील कारखान्यात तिचे उत्पादन होईल. प्रथम दरमहा ५०० मोपेडचे उत्पादन केले जाईल. ते वाढवीत वाढवीत दरमहा २,००० पर्यंत नेले जाईल. श्री. एन. ए. फिरोदिया हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

तापल्या लोखंडावर घाव घाला...

या म्हणीची व्याप्ती फार मोठी आहे. पैशाचेच उदाहरण घ्या. नुसता मुबलक पैसा असून उपयोगी नाहीं. उत्पादनक्षम उद्योगधंद्याची यशस्वीता पैशाची वेळेवर तरतूद होण्यावर अवलंबुन आहे. तसेच लघुउद्योगधंदा करणारास अगर स्वतःचा धंदा असणाऱ्या कारागीरास आपल्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच तज्ञांकडुन आर्थिक बाबीसंबंधीहि कळकळीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. याची जाणीव होते.

यांसाठीं बँक ऑफ इंडीयाच्या नजिकच्या शाखेत विचारणा का करीत नाहीं ?

बँक ऑफ इंडिया

RAAS/B/127 BMAR

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.


— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

---



(मावळा सातारा)

नाण्याला

## तीन बाजू असतात...

दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)

युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनरूप विविध ठेव योजना.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

स्थापना: १९३६ — महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा — शेड्युल्ड बँक

**वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.**

बँकेच्या या संलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

---

# THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659-60, Raviwar Peth, Belgaum

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital & Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lockers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT** — *General Manager.*

**K. B. KIRTIKAR** — *Chairman.*

---

# ओगले

## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

**मार्गदर्शक व विश्वसनीय.**

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)